जनता पत्र दि. 8.10.25

## जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली

# पीरबुऱ्हान अपहरण प्रकरणातील आरोपी २४ तासात जेरबंद

## पो.नि संतोष तांबे यांची दमदार कामगिरी

... बालाजी धनसरे ...

नांदेड-जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी शहरातील पीर बुरहान नगर भागात घडलेल्या अपहरण प्रकरणी प्रत्यक्ष लक्ष घालून अत्यंत शिघ्रतेने पोलीस यंत्रणेला योग्य मार्गदर्शन करून तपास करावा असे फर्मान काढले होते. भाग्यनगर पोलीस स्टेशनचे तरुण तडफदार कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी अत्यंत तत्परतेने पोलीस अध्यक्षकाच्या आदेशाचे पालन करून संवेदनशील असलेल्या प्रकरणाच्या तपासाची अत्यंत गतीमान पद्धतीने पोलीस स्टेशन मधील सर्व विभागाच्या प्रमुखांना विश्वासात घेऊन तत्पर तपास केल्यामुळे या प्रकरणातील आरोपींना २४ तासाच्या आत जेरबंद केल्यामुळे शहरातील शांतता प्रेमी नागरिकांमध्ये पोलीस प्रचशासनाच्या कामगिरीबद्दल आत्मविश्वास वाढल्याचे दिसत आहे.

मुळात या जिल्ह्याला कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक म्हणून अविनाश कुमार यांनी पदभार घेतला तेव्हापासून जिल्ह्यातील दादागिरी गुंडागर्दी अवध्य धंदे करणाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात बंदोबस्त केल्यामुळे शहरासह जिल्ह्यातील अवध्य धंदे सर्वत्र बंद असल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यात सर्व ठिकाणी पोलीस स्टेशनवर कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या नेमणूक केल्यामुळे सध्या जिल्ह्यात शांतता सुव्यवस्था अबाधित असल्याचे दिसत आहे.

शहरातील भाग्यनगर हा भाग अति संवेदनशील म्हणून ओळखला जातो या भागात मोठ्या प्रमाणात दादागिरी अवैध धंदे गुंडगिरी चालत असे परंतु पोलीस अधीक्षक अविनाश कुमार हे शहरातील गुंडागर्दी अवैद्य धंदे करणाऱ्या वर करडी नजर ठेवून असल्यामुळे शहरातील अवैध धंदे करणारे व दादागिरी करणारे यांचे धाबे दणाणले आहेत.

सध्या जिल्ह्यात सर्वत्र अवैध धंदे बंद असल्याचे चित्र निर्माण झाले आहे भाग्यनगर पोलीस स्टेशन वर पोलीस निरीक्षक तांबे हे शिस्तप्रिय कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून काम करीत असल्यामुळे या भागातील दादागिरी व अवैध धंद्यावर बऱ्याच प्रमाणात चाप बसल्याचे दिसत आहेपोलीस स्टेशन लोहा येथे कार्यरत असताना पोलीस निरीक्षक तांबे यांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता बोरगाव येथील संवेदनशील प्रकरणी अत्यंत तत्परतेने परिस्थिती हाताळून दोन्ही बाजूच्या लोकावर कायदेशीर कारवाई करून दोन्ही बाजूच्या लोकांना अटक करून त्या प्रकरणावर पडदा पडला होता भाग्यनगर पोलीस ठाण्याचा पदभारघेतला तेव्हापासून पोलीस निरीक्षक तांबे हे पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत तत्परतेने कर्तव्य बजावत असल्यामुळे या भागातील गुंडगिरी अवैध धंदे गुंडागर्दी मोठ्या प्रमाणात पान ४ वर